ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २३० • बुधवार दि.१० जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## विधान परिषद निवडणूक मराठी माणसांची नव्हे,धनदांडग्यांची

### आ.हेमंत पाटील यांचा अप्रत्यक्ष निशाणा कुणावर?



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेत्यांमध्ये समन्वय दिसून येत असताना शिवसेना मात्र या निवडणूक प्रक्रियेपासून अलिप्त असल्याचे चित्र आहे. शिवसेनेचे नेते तथा आ.हेमंत पाटील यांनी विधान परिषद निवडणूक मराठी माणसांची नव्हे, धनदांडग्यांची झाली आहे असा आरोप प्रसार माध्यमांशी बोलतांना केला आहे. या निवडणुकीपासून स्वतःला दूर ठेवत सध्याच्या निवडणूक पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

विधान परिषद निवडणूक ही आता सामान्य मराठी माणसाची राहिलेली नसून धनदांडग्यांची निवडणूक बनली असल्याचा आरोप हेमंत पाटील यांनी केला. या निवडणुकीत पैशांचा मोठा बाजार सुरू असून त्यात सहभागी होण्याची आपली इच्छा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कोळशाच्या खाणीत हात काळे करून घेण्याची इच्छा नाही. त्यामुळेच मी या निवडणुकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असून, त्यांचा रोख नेमका कुणाकडे आहे, याबाबत तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. विधान परिषद निवडणुकीत आर्थिक व्यवहारांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप करत हेमंत पाटील यांनी अप्रत्यक्षपणे सध्याच्या राजकीय व्यवस्थेवरच बोट ठेवले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आगामी काळात महायुतीतील अंतर्गत समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नांदेड विधान परिषद निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमध्ये दिलजमाई झाल्याचे चित्र असताना शिवसेना (शिंदे) मात्र काहीशी अलिप्त राहिल्याचे दिसून येत आहे. शिवसेनेचे नांदेड जिल्ह्यात चार आमदार आहेत. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजपच्या नेत्यांसोबत शिवसेनेमधील काही नेत्यांचे मतभेद आहेत. अशा परिस्थितीत आ.हेमंत पाटील यांच्या वक्तव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## मुख्यमंत्री कार्यालय,विधान भवनासह संघ मुख्यालयालाही बॉम्बस्फोटाची धमकी

### राज्यातील सुरक्षा यंत्रणा तातडीने अलर्ट मोडवर

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील अनेक महत्त्वाच्या शासकीय आणि संवेदनशील ठिकाणांना बॉम्बस्फोट घडवून उडवण्याची धमकी देणारा ई-मेल बुधवारी (१० जून) प्राप्त झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. मुख्यमंत्री कार्यालय, विधान भवन, रेशीमबाग येथील आरएसएस मुख्यालय तसेच मुंबई आणि पुण्यातील महापौर कार्यालयांना लक्ष्य करण्याचा इशारा या ई-मेलमध्ये देण्यात आल्याने राज्यातील सुरक्षा यंत्रणा तातडीने अलर्ट मोडवर आली आहे.

धमकीच्या ई-मेलमध्ये आयईडी बॉम्बस्फोटांचा उल्लेख करण्यात आला असून, काही ठिकाणांसाठी विशिष्ट वेळांचाही संदर्भ देण्यात आला आहे. पुणे महापौर कार्यालयात दुपारी १.११ वाजता, तर पुण्यातील विधान भवन आणि नागपूरमधील रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार भवन परिसरात दुपारी ३.११ वाजता स्फोट घडवून आणण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच १० जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत पुणे आणि नागपूरमधील आरएस-एसच्या विविध शाखांना सकाळी ६.११ ते रात्री ९.११ या वेळेत लक्ष्य केले जाईल, असेही नमूद करण्यात आले आहे. धमकी मागील कारण स्पष्ट करताना ई-मेलमध्ये १९८४ मधील ऑपरेशन ब्ल्यू स्टार आणि ऑपरेशन वूडरोझचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या घटनांचा संदर्भ देत बदला पान ४ वर

## काँग्रेसमध्ये तृणमूल विलीन करण्याचा प्रस्ताव; ममता बॅनर्जी यांना उपाध्यक्षपदाची ऑफर

नवी दिल्ली:पश्चिम बंगालमधील राजकीय घडामोडींना वेग आला असून तृणमूल काँग्रेस (टीएमसी) काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा प्रस्ताव काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासमोर ठेवल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.भाजपकडून वाढत्या राजकीय दबावाच्या पार्श्वभूमीवर हा प्रस्ताव देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी काही दिवसांची मुदत



मागितल्याचीही चर्चा आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, टीएमसीचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण झाल्यास ममता बॅनर्जी यांना पक्षाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदाची, तर अभिषेक बॅनर्जी यांना महासचिवपदाची जबाबदारी देण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. ममता बॅनर्जी यांनी सोनिया गांधी यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास एक तास चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. ८ जून रोजी टीएमसीचे राज्यसभा सदस्य सुखेंदू शेखर यांनीही पक्षाचा राजीनामा दिला होता. गेल्या काही दिवसांत टीएमसीमध्ये मोठी फूट पडल्याचे चित्र दिसत आहे. ३ जून रोजी पक्षातील ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनी ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र गट स्थापन केल्याचे वृत्त समोर आले. या गटाने विधानसभा अध्यक्षांकडे पाठिंब्याचे पत्र सादर करून ऋतब्रता बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेतेपद देण्याची मागणी केली होती. पान ४ वर

## माहूर गडावरील प्रसादाच्या पेढ्यांची चौकशी करा-सुधाकर भोयर

माहूर/प्रतिनिधी-तीर्थक्षेत्र असलेल्या माहूरगडावरील श्री रेणुका माता मंदिर आणि दत्त शिखर संस्थान येथे दर्शनासाठी येणारे भाविक मंदिर परिसरातील दुकानांमधून प्रसाद खरेदी करतात. मात्र अनेक दुकानांतून भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री होत असल्याचा आरोप करत, प्रसादासाठी वापरण्यात येणारा खवा नेमका कुठून येतो आणि पेढे कुठे तयार केले जातात याची सखोल चौकशी करून भाविकांच्या आरोग्याशी होणारा खेळ तात्काळ थांबवावा, अशी मागणी भाजप नेते सुधाकर भोयर यांनी केली आहे.

माहूरगडावरील मंदिर परिसरात पान, फुले व प्रसाद विक्रीची अनेक दुकाने आहेत. या दुकानांमधून प्रसाद म्हणून विक्री होणाऱ्या पेढ्यांच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विक्रीस असलेल्या पेढ्यांच्या बॉक्सवर उत्पादनाची तारीख, मुदत समाप्तीची तारीख किंवा उत्पादकाची माहिती नमूद नसल्याचे दिसून येत आहे. पेढ्यांचा दर्जा काय आहे, याबाबत विचारणा केल्यास दुकानदारांकडून हे पेढे सात दिवस टिकतात असे उत्तर दिले जात असल्याची माहिती समोर आली आहे. सुधाकर भोयर हे दर्शनासाठी माहूरगडावर आले असता त्यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. याबाबत त्यांनी स्थानिक नागरिकांशी चर्चा केली असता, प्रसादासाठी वापरण्यात येणारा खवा धाराशिवकडून येणाऱ्या बसमधून आणला जात असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. हा खवा बसस्थानकात पोहोचण्यापूर्वीच टी-पॉइंट परिसरात उतरवला जात असल्याचेही स्थानिकांकडून सांगण्यात आले. तसेच या खव्यात युरिया व सोयाबीनसारख्या पदार्थांचा वापर होत असल्याची माहिती मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे. प्रसादाच्या नावाखाली भाविकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत, अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सुधाकर भोयर यांनी केली. निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांच्या विक्रीमुळे भाविकांमध्ये तीव्र नाराजी असून श्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेला हा प्रकार त्वरित बंद करण्यात यावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## ट्रॅक्टरची ॲटोला धडक; ९ प्रवासी गंभीर जखमी

देगलूर/प्रतिनिधी-प्रवासी वाहतूक करणाऱ्या ॲटोला ट्रॅक्टरने धडक दिल्याने ॲटोतील ९ प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी रात्री आलापूर ते खानापूर रस्त्यावर घडली. यातील तीन प्रवाशांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नांदेड येथे पुढील उपचारासाठी हलवण्यात आली आहे.

या संदर्भात हाती आलेली माहिती अशी की,पाळा ता. मुखेड येथील काही जण प्रवासी ॲटोने देगलूर येथील नातेवाईकांच्या कार्यक्रमाला येत होते, त्याचवेळी खानापूरहून तडखेलकडे जाणाऱ्या ट्रॅक्टरने ॲटोला समोर कट मारून धडक दिल्याने झालेल्या अपघातात ॲटोतील प्रवासी गंभीर झाल्याची घटना मंगळवारी रात्री उशिरा खानापूर आलापुर रस्त्यावर घडली. या जखमीतील तीन जणांची प्रकृती गंभीर बनल्याने त्यांना नांदेडला हलवण्यात आल्याचे रुग्णालयातून सांगण्यात आले. पाळा ता. मुखेड येथील साहिल महेबूब शेख, मुबीन सत्तार शेख, अमीनाबी रहेमान शेख, गफारसिंग रहमान शेख, परविनबी सत्तार शेख, सुलेमान सत्तार शेख, राजू मारुती बोनतेवार, मेहराज गफार शेख, रहमान सय्यद हे या ऑटोतून प्रवास करत होते. यातील सुलेमान सत्तार शेख, परवीनबी सत्तार शेख, सतार रहेमान शेख यांची प्रकृती अतिगंभीर बनल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेडला हलवण्यात आले आहे.

## 'त्यांची'नेहरुंच्या योगदानाशी कशी तुलना होऊ शकते : खा.शरद पवार



मुंबई/प्रतिनिधी- नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदावर ४ हजार ३९९ दिवस पूर्ण करून दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मोडला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या कार्यकाळाच्या विक्रमाबद्दल त्यांच्यावर एनडीए तसेच भाजपसमर्थकांकडून जोरदार कौतुक केले जात आहे. मात्र, यावरून ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खा.शरद पवार यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. काही लोक यांच्यासारखा नेता झाला नाही, हे सांगण्याचा प्रयत्न करत आहेत, या शब्दांत शरद पवार यांनी या दाव्याचा समाचार घेतला. तसेच यावेळी त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या योगदानाशी तुलना कशी होऊ शकते, असा सवालही केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापनदिनाच्या सोहळ्यात शरद पवार यांनी या निमित्ताने पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला.

नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतली तेव्हापासून ते सलग तिसऱ्यांना पंतप्रधानपदी आहेत. आता त्यांनी या पदावर ४ हजार ३९९ दिवस पूर्ण करून पंडित नेहरूंचा पंतप्रधानपदाचा विक्रम मोडला आहे. यावरून शरद पवार यांनी पक्षाच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींवर टिकेचा आसूड ओढला आहे. नरेंद्र मोदी यांची तुलना नेहरूंशी होऊ शकत नाही. पंडित नेहरूंचे योगदान खूप मोठे होते. त्यांनी शून्यातून भारत निर्माण केला आहे. त्यामुळे नेहरुंच्या योगदानाशी नरेंद्र मोदी यांची तुलना कशी होऊ शकते, असा सवाल त्यांनी केला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान होण्याआधी देशाच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी लढले होते. त्यांनी देश संघटीत करण्याचे काम केले. त्यांच्यामुळे देशात सुधारणेचे वारे वाहिले. त्यांच्यानंतर इंदिरा गांधी यांनीही तेवढ्याच निष्ठेने देशाची सेवा केली. इंदिरा गांधी यांनी देशाच्या प्रतिष्ठेशी कधीही तडजोड केली नाही. त्यांनी जगात देशाची प्रतिष्ठा सांभाळली, असे शरद पवार यांनी सांगितले. या सर्व पार्श्वभूमीवर पंडित नेहरू यांच्या योगदानाची तुलना नरेंद्र मोदी यांच्याशी होऊ शकत नाही, याकडे शरद पवार यांनी लक्ष वेधले. अमृतसर येथील एका कार्यक्रमात राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी केलेल्या वक्तव्याचाही त्यांनी चांगलाच समाचार घेतला.

## शिष्यवृत्ती अभावी टी.सी.रोखणाऱ्या व पैशांची मागणी करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करा

### एसएफआयची समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्तांकडे मागणी

नांदेड/प्रतिनिधी-विविध अभ्यासक्रमांच्या पुढील प्रवेशासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची टी.सी. काढण्यासाठी लगबग सुरू असतानाच, अनेक महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची अडवणूक केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. समाज कल्याण विभागाकडून मिळणारी शिष्यवृत्ती वेळेवर जमा न झाल्याचे कारण पुढे करत महाविद्यालये विद्यार्थ्यांची टी.सी. रोखून धरत आहेत, तसेच टी.सी. देण्यासाठी नियमबाह्य पैशांची मागणी करत आहेत. या बेकायदेशीर प्रकाराविरोधात स्टूडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया संघटनेच्यावतीने बुधवारी समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांना निवेदन देऊन दोषी महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दरवर्षी समाज कल्याण विभागामार्फत मिळणारी शिष्यवृत्ती वेळेवर जमा होत नाही. याचा गैरफायदा घेत जिल्ह्यातील अनेक शाळा आणि महाविद्यालये 'पूर्ण फी भरल्याशिवाय टी.सी. मिळणार नाही' अशी बेकायदेशीर भूमिका घेतात. एवढेच नव्हे तर अनेक ठिकाणी टी.सी. देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून उघडपणे देणगी किंवा अतिरिक्त शुल्काच्या नावाखाली पैशांची मागणी केली जाते. या आर्थिक आणि मानसिक छळामुळे जिल्ह्यातील अनेक गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक भवितव्य धोक्यात




आले आहे.या पार्श्वभूमीवर एसएफआयने सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग नांदेड यांना निवेदन देवून केवळ शिष्यवृत्ती जमा झाली नाही म्हणून विद्यार्थ्यांची टी.सी. रोखणाऱ्या महाविद्यालयांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, टी.सी. साठी नियमबाह्य पैशांची मागणी करणाऱ्या संस्थांची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, सर्व शाळा व महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची अडवणूक न करण्याबाबत पान ४ वर

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १४० प्रतिबंधात्मक कारवाया

नांदेड/प्रतिनिधी- जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबविलेल्या विशेष मोहिमेत १४० प्रतिबंधात्मक कारवाया करून १० लाख ७२ हजार ८८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक एस. एल. कदम यांनी दिली.

पुणे-फुगेवाडी येथे मिथेनॉल मिश्रित हातभट्टी दारू सेवनामुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात २९ मेपासून अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली. तसेच २ जूनपासून हातभट्टीमुक्त नांदेड जिल्हा मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले होते. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, सहआयुक्त आणि विभागीय उपआयुक्त यांच्या निर्देशानुसार अधीक्षक एस. एल. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील निरीक्षक, दुय्यम निरीक्षक आणि भरारी पथकांनी २९ मे ते ८ जून या कालावधीत ही कारवाई केली. या कालावधीत एकूण १४० गुन्हे नोंदविण्यात आले असून १३७ वारस प्रकरणे दाखल करण्यात आली. १४२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# मर्यादा, संस्कृती, निसर्ग आणि मानवतेचे खरे स्वरूप



मर्यादा हीच भारतीय संस्कृतीची खरी ओळख आहे आणि खरी संपत्तीही तीच आहे. संपत्ती, वैभव, सत्ता किंवा प्रतिष्ठा यापेक्षा माणसाच्या जीवनातील मर्यादा, संस्कार, ज्ञान आणि मानवता यांना अधिक महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीने हजारो वर्षांपासून जगाला संयम, सहिष्णुता, बंधुभाव आणि सर्व जीवमात्रांविषयी आदर यांचे धडे दिले आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आचार-विचारांमध्ये आणि वर्तनामध्ये मर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे.

जन्म आणि मृत्यू ही निसर्गाच्या हाती असलेली प्रक्रिया आहे. कोणताही मनुष्य, कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही देव जन्म देऊ शकत नाही आणि मृत्यूही देऊ शकत नाही. जन्म आणि मृत्यू यामागे निसर्गाचे शाश्वत नियम कार्यरत असतात. या विश्वातील प्रत्येक सजीव आणि निर्जीव गोष्ट निसर्गाच्या नियमांनुसार चालते. त्यामुळे निसर्गाचा आदर करणे आणि त्याचे महत्त्व समजून घेणे ही काळाची गरज आहे.आपण अनेकदा अंधश्रद्धा, भ्रम आणि चुकीच्या समजुतींवर विश्वास ठेवतो. पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या अनेक गोष्टींचा आपण विचार न करता स्वीकार करतो. परंतु सत्याचा शोध घेण्यासाठी विवेक, ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टीकोन आवश्यक असतो. आपल्या कर्मातूनच आनंद निर्माण होतो. चांगले कर्म माणसाला सुख आणि समाधान देते, तर वाईट कर्म विनाशाकडे घेऊन जाते. ही बाब प्रत्येकाने समजून घेतली पाहिजे. पूर्वीच्या काळात विज्ञानाचा विकास झाला नव्हता. त्यामुळे अनेक नैसर्गिक घटनांचे स्पष्टीकरण माणसाला माहीत नव्हते. त्या काळातील समाजाने श्रद्धा, परंपरा आणि रूढी यांच्या आधारावर आपले जीवन जगले. परंतु कालांतराने मानवाच्या बुद्धीने अनेक संशोधने केली. नवनवीन शोध लागले. जगाचा इतिहास बदलला. विज्ञानामुळे विकासाची गंगा प्रत्येकापर्यंत पोहोचली. आधुनिक तंत्रज्ञानामुळे जीवन अधिक सुलभ झाले. आज माणूस अवकाशात पोहोचला आहे, समुद्राच्या तळाशी जाऊन संशोधन करीत आहे आणि विश्वातील रहस्ये उलगडण्याचा प्रयत्न करीत आहे.हे सर्व निसर्गातून निर्माण झालेल्या प्रक्रियांचे परिणाम आहेत. मात्र विज्ञानाचा दुरुपयोग होऊ नये. कारण निसर्गाला आव्हान देणारी कोणतीही गोष्ट दीर्घकाळ टिकू शकत नाही. निसर्गच ईश्वरस्वरूप आहे. निसर्गाशिवाय कोणत्याही सजीवाचे अस्तित्व शक्य नाही. म्हणूनच निसर्गाचे संरक्षण करणे आणि त्याच्याशी सुसंवाद ठेवणे ही मानवाची जबाबदारी आहे.

आज जगभरातील विविध धर्मांमध्ये अनेक मठ, मंदिरे, मशिदी, चर्च आणि प्रार्थनास्थळे उभी राहिली आहेत. या धार्मिक स्थळांवर अब्जावधी रुपयांचा खर्च केला जातो. परंतु देवाची विभागणी करण्याचा प्रयत्न माणूस करतो, हे दुर्दैव आहे. देव हा एका धर्माचा किंवा एका समाजाचा असू शकत नाही. देव शोधण्यासाठी योग्यता लागते आणि ती योग्यता ज्ञानावर आधारित असते.संतांनी म्हटले आहे. देव पाहावयास गेलो, देव होऊन आलो. या वाक्याचा खरा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. देवाचे स्वरूप बाहेर शोधण्यापेक्षा स्वतःमध्ये शोधणे महत्त्वाचे आहे. माणसामध्ये जेव्हा सत्य, प्रामाणिकपणा, करुणा, प्रेम आणि मानवतेचे गुण निर्माण होतात, तेव्हाच तो देवत्वाकडे वाटचाल करतो. सत्याचा स्वीकार करणारा आणि निसर्गाचा समतोल समजून घेणारा मनुष्य ज्ञानाच्या प्रकाशाने उजळून निघतो. अशा व्यक्तीमध्ये देवत्व प्रकट होते.या पृथ्वीवरील सर्वात मोठी शक्ती म्हणजे मानवी बुद्धी. पुढे काय घडणार आहे, यावर बऱ्याच प्रमाणात मानवाच्या कृती अवलंबून असतात. प्राणी आणि वृक्ष यांच्यामध्येही प्राण असतो. परंतु विवेक, विचार आणि संशोधन करण्याची क्षमता मानवाला लाभली आहे. म्हणूनच माणसाने या शक्तीचा योग्य उपयोग करणे आवश्यक आहे. निसर्ग नसेल तर आपणही नाही. हवा, पाणी, अन्न, सूर्यप्रकाश आणि पृथ्वी या सर्व गोष्टींमुळेच आपले अस्तित्व टिकून आहे. त्यामुळे खऱ्या देवाची ओळख करून घेणे आवश्यक आहे. तो देव बाहेर नसून प्रत्येक माणसाच्या चांगुलपणात आणि निसर्गाच्या अद्भुत शक्तीमध्ये आहे.आज मानवाची स्थिती फार विचित्र झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबरच माणूस नैतिकदृष्ट्या अधोगतीकडे जात असल्याचे दिसून येते. स्वार्थ, लोभ, मत्सर आणि द्वेष यांमुळे समाजातील सौहार्द कमी होत आहे. अनेकजण देव-देव करून आपली शक्ती वाया घालवत आहेत; परंतु माणसातील देव ओळखण्याचा प्रयत्न करीत नाहीत.दुसऱ्यांच्या वेदना समजून घेणारा, दुःखात धावून जाणारा आणि गरजूंच्या सुख-दुःखात सहभागी होणारा मनुष्यच खऱ्या अर्थाने ईश्वरी सेवा करीत असतो. मानवतेची सेवा हीच सर्वात मोठी पूजा आहे. जो दुसऱ्याला आधार देतो, तोच खऱ्या अर्थाने देवत्वाचा अनुभव घेत असतो. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात मर्यादा असणे अत्यंत आवश्यक आहे. मर्यादेबाहेर गेलेले वर्तन समाजात अराजक निर्माण करते. आदर मिळवण्यासाठी प्रथम आदर देण्याची वृत्ती असली पाहिजे. स्वतः आदरणीय होण्याची पात्रता निर्माण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.केवळ बाह्य शृंगार किंवा दिखाऊपणाला महत्त्व देऊन चालणार नाही. ज्ञानाचा शृंगार अधिक आवश्यक आहे. समाजाची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी शिक्षण, विचार आणि विवेक यांना महत्त्व द्यावे लागेल. ज्ञानामुळे नवीन विचार जन्माला येतात आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो.संपत्तीपेक्षा संतती श्रेष्ठ बनविणे आवश्यक आहे. मुलांना संस्कार, शिक्षण आणि मानवतेची शिकवण देणे हेच खरे दैवी कार्य आहे. पैसा, मालमत्ता आणि ऐश्वर्य क्षणभंगुर आहे; परंतु चांगले संस्कार आणि ज्ञान ही कायमस्वरूपी संपत्ती आहे.मानवी बुद्धी हे एक अद्भुत यंत्र आहे. या बुद्धीमुळेच मानवाने विज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड प्रगती केली. भविष्यात आणखी नवनवीन शोध लागतील. निसर्गामध्ये असंख्य रहस्ये दडलेली आहेत. निसर्ग कधी शांत असतो, तर कधी रौद्र रूप धारण करतो. कधी तो मानवाला पोषक ठरतो, तर कधी संकटे निर्माण करतो. ही निसर्गाची अद्भुत किमया आहे. म्हणूनच प्रत्येकाच्या बोलण्यात, वागण्यात आणि आचारात संस्कृती दिसली पाहिजे. तीच खरी संपत्ती आहे. जेव्हा माणूस एकमेकांचा आदर करू लागतो, तेव्हा समाजात सौहार्द निर्माण होते. अनादर, अपमान आणि द्वेष यामध्ये वेळ घालवण्यापेक्षा प्रेम आणि सहकार्य वाढविणे अधिक महत्त्वाचे आहे.भारताने विज्ञानाच्या क्षेत्रात अनेक महान व्यक्तिमत्त्वे दिली आहेत. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी देशाच्या वैज्ञानिक प्रगतीसाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांनी जात, धर्म आणि पंथ यांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रसेवा केली. त्यांच्या कार्याला आजही संपूर्ण देश सलाम करतो. त्यांच्यासारखी व्यक्तिमत्त्वे मानवतेचे प्रतीक असतात.आजही समाजामध्ये जात-पात, उच्च-नीच आणि भेदभावाचे विष अस्तित्वात आहे. प्रत्यक्षात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या संकल्पना कामाच्या विभागणीशी संबंधित होत्या. परंतु कालांतराने त्यांचे रूपांतर भेदभावात झाले. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. माणसाला माणूस म्हणून ओळखणे आवश्यक आहे. त्याची माणुसकी, त्याचे विचार, त्याचे गुण आणि त्याचे दोष यांचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक मनुष्याला आनंदी आणि सुखी जीवन जगण्याचा अधिकार आहे. आनंदामध्येच देवत्वाचा अनुभव येतो.मूळ प्रश्न असा आहे की निसर्ग निर्माण कोणी केला? सूर्य, चंद्र, तारे आणि आकाशगंगा निर्माण करणारी शक्ती कोणती? या प्रश्नांची संपूर्ण उत्तरे अजूनही मानवाला सापडलेली नाहीत. कदाचित भविष्यात विज्ञान या रहस्यांवर अधिक प्रकाश टाकेल. या विश्वामागे एक अदृश्य ऊर्जा कार्यरत आहे. त्या ऊर्जेचाच शोध मानव घेत आहे.आपण सूर्य आणि चंद्र गाठले, परंतु त्यांना निर्माण करणाऱ्या शक्तीचा शोध अजूनही सुरू आहे. हे विश्व एका अथांग बुद्धीचे आणि अनंत ऊर्जेचे प्रतीक आहे. या विश्वाचा प्रारंभ कसा झाला आणि शेवट कधी होईल, हे सांगणे कठीण आहे.म्हणूनच वर्तमानात जगणे आवश्यक आहे. मिळालेल्या जीवनाचा सदुपयोग करणे आवश्यक आहे.निसर्गाला समजून घेणे, संस्कृतीचे रक्षण करणे आणि मर्यादांचे पालन करणे हीच खरी जीवनशैली आहे.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

कोणी देव म्हणा, अल्ला म्हणा, ईश्वर म्हणा किंवा परमशक्ती म्हणा, परंतु सर्वांचा स्रोत एकच आहे. सर्वांचे रक्त लाल आहे, सर्वांना भूक लागते, सर्वांना आनंद आणि दुःख जाणवते. मग भेदभाव कशासाठी?मतभेदांची बीजे पेरल्यामुळे समाजात अंधार निर्माण होतो. भावना दुखावल्या जातात. हे टाळणे आवश्यक आहे. एकमेकांच्या भावनांचा आदर करणे हीच खरी संस्कृती आहे.आपला श्वास काही क्षणांसाठी थांबला, तर आपल्याला स्मशानाचा मार्ग धरावा लागतो. याचा अर्थ असा की आपल्याला जिवंत ठेवणारी शक्ती म्हणजे ऊर्जा आहे. तीच ईश्वर आहे. त्या ऊर्जेमुळेच आपण जगत आहोत.आपल्याला प्राप्त झालेल्या संस्कृतीचा सदुपयोग करणे, मानवतेचे रक्षण करणे, निसर्गाचा आदर करणे, ज्ञानाचा प्रसार करणे आणि मर्यादांचे पालन करणे हेच खरे दैवी कार्य आहे. माणसाने माणसाशी प्रेमाने वागावे, भेदभाव दूर करावा आणि मानवतेला सर्वोच्च स्थान द्यावे. कारण शेवटी माणुसकी हाच सर्वात मोठा धर्म आहे आणि निसर्ग हाच खरा ईश्वर आहे.ही जाणीव प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली, तर समाजात शांतता, समता, बंधुभाव आणि खऱ्या अर्थाने मानवतेचे राज्य निर्माण होईल.हाच भारतीय संस्कृतीचा मूलभूत संदेश आहे आणि हाच मानवजातीच्या उज्ज्वल भविष्याचा पाया आहे.

# पर्यापुरणपुरक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात व्हावा

आजची शिक्षणपद्धती ही पर्यावरणपुरक नाही असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. त्याचं कारणंही तसंच आहे. शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. ते बरोबर आहे. कारण ते पेल्यावर लोकँ वाघिणीसारखं गुरगुरणार असं लोकांना वाटतं. पण त्यात तसूभरही सत्यता नाही. कारण अलिकडं लोकांनी शिक्षणाला वाघिणीचं नाही तर शेळीमेंढीचं दूध बनवलं आहे. जे प्राशन करताच मनुष्य शेळीमेंढीसारखा वागायला लागतो. मग कोणीही येवून त्याला गुलाम बनवून त्या लोकांना शेळीमेंढींसारखाच वापर करीत असतो.

माणसांच्या या शिक्षणपद्धीत ज्याप्रमाणे अशा वाघाच्या गुरगुरण्याला महत्व आहे. तसेच महत्व पर्यावरणपुरक शिक्षणालाही आहे. आता लोकँ म्हणतील की आम्ही पर्यावरण पुरक शिक्षण घेत नाहीत का? आमच्याही शिक्षणात पशूपक्षांना महत्व आहे. त्यांचा अभ्यास आम्ही करतो. आम्ही पृथ्वीचा अभ्यास करतो. आम्ही गाय दूध देते. हे अभ्यासतो. झाडं फळं देतात हेही अभ्यासतो. हा पर्यावरणाचा अभ्यास नाही का? होय हाही पर्यावरणाचाच अभ्यास आहे. पण महत्वाची गोष्ट अशी की या अभ्यासातून पर्यावरण वाचवा हा संदेश मिळत नाही. खरं तर आम्ही असे बोललो की आम्हाला लोकँ वेड्यात काढल्याशिवाय राहणार नाही.आम्ही भुगोल शिकतो. सा. विज्ञान शिकतो.भौतीकशास्त्र शिकतो. त्यातच पर्यावरणही शिकतो. कशानं शिकतो तर त्याचं उत्तर येईल की पाठ्यपुस्तकानं.आता पाठ्यपुस्तक कशी बनतात? असा प्रश्न विचारल्यास काही चूप राहतील. काही हसतील व काहींकडून



उत्तर येईल की कागदावर छपाई करुन त्याला बाईंडींग करुन पाठ्यपुस्तक बनतात. मग विचारलं की कागद कसा बनतो? तर उत्तर येईल लाकडापासून. आता लाकूड कोणते? आता मात्र उत्तर बहुतेक येणारच नाही. कागद तयार करतांना शेकडो झाडांची हत्या केली जाते. त्या लाकडाचा किस काढला जातो. तो किस भिजत टाकला जातो व त्यापासून लगदा तयार करुन कागद तयार केला जातो. जे पर्यावरणपुरक नाही. आता लोक म्हणतील की झाडांचा उपयोग नाही केला तर पाठ्यपुस्तक तयार कशी होतील? अन् झाडांना जीव नाही. परंतू महान शास्त्रज्ञ जगदिशचंद्र बोस यांनी लाजाळूच्या पानावर १० मे १९०१ मध्ये एक प्रयोग करुन सिद्ध केलं की वनस्पतींलाही जीव आहे. त्या वनस्पतीच्या लाकडापासून किस काढतांना वा वनस्पतीचं लाकूड कापतांना वृक्षांची हत्या होतच असते.

अंकुश शिंगाडे
नागपूर

विशेष म्हणजे आम्ही आमचं जीवन जगण्यासाठी जे घटक अभ्यासातून शिकतो. त्यात मांस खाणे, अंडी खाणे, मासे खाणे ह्याही गोष्टींचा अभ्यासक्रमात समावेश होतो. समजा एखादी विहिर खोदण्याची कलाही आम्हाला अभ्यासातूनच शिकता येते. ज्या विहिर खोदण्यातून पृथ्वीला इजा होवून पृथ्वीची भुगर्भ साखळी बिघडते. त्यातच जागोजागी पृथ्वीला तडे जावून कुठं कुठं भुकँप होतात. तर कुठंकुठं भुस्खलन. पृथ्वीचा हाच अभ्यास करीत असतांना लोकँ दगडी कोळसा मिळविण्यासाठी वा खनिजे मिळविण्यासाठी पृथ्वीचं गर्भाक्षय खोदतात. त्याचा परिणाम असा होतो की ज्या भागात अशी खनिजे मिळतात. त्याखाली बरीचशी पोकळी पडल्याने ती पोकळी ज्यावेळी खचते. त्यावेळी तिथे पर्वतरांग तयार होते हे तेवढेच खरे आहे. परंतू ही पर्वतरांग तयार होतांना कित्येक त्या भागात राहणारी माणसं ही त्या पर्वतरांगेत गाडली जातात. म्हणून आजची शिक्षण पद्धती ही पर्यावरणपूरक नाही.

पूर, भुकँप, वादळं यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. मांस खाणे वा मासे खाणे गरजेचे आहे. कारण त्यापासून आपल्या शरीराला जीवनसत्व व संप्रेरके मिळतात. तसं पाठ्यपुस्तकातच लिहिलेलं आहे. परंतू त्यातून निसर्गाची हानीही होते हे मात्र पुस्तकात लिहिलेलं नाही. लाकूडतोड करुन घर बांधतात हे पुस्तकात लिहिलेलं आहे. परंतू त्यातून निसर्गाची हानी होते हे काही पुस्तकात लिहिलेलं नाही. त्यातच पाणी मिळविण्यासाठी विहिर खोदणे हे पुस्तकात लिहिलेलं आहे. परंतू त्यातून निसर्गाची हानी होते हे मात्र पुस्तकात लिहिलेलं नाही.कोणताही सजीव हा निसर्गाचा लेकरु. मग तो लहानात लहान असलेला जीवाणू का असेना वा विषाणू का असेना. ज्यावेळी निसर्ग कोपतो.त्याचा समतोल बिघडतो. त्यावेळी निसर्गही निसर्गसाखळी बदलवतो आणि तोच निसर्ग जणू बदला घेतल्यागत वेगवेगळ्या आजारामार्फत पृथ्वीवर बदला घेण्यासाठी येतो. तोच बदला म्हणजे कोरोना व्हायरस किंवा ब्लैक फँगस म्हणता येईल. तो बदला घेण्यासाठी जेव्हा येतो. त्यात भल्लीमोठी हानीही होते.

आमच्या शिक्षणात हा जो बदल होत असतो. तोच बदल म्हणजे कोरोना व्हायरस किंवा ब्लैक फँगस होय. आमची अन्नसाखळी ही पाठ्यपुस्तकातून हेच सत्य प्रतिपादन करीत असते. आमची शिक्षणपद्धती ही चोरावर मोर असंच शिकवीत असते. जसे बेडकाला साप खातो.सापाला गिधाडं खातात. गिधाडं मेली की त्यांना जमीनीतील किटकँ खातात. अशा किटकांना पुन्हा बेडकँ खात असतात. पुन्हा बेडकाला साप. सापाला गिधाडं. ही आमची शिक्षणपद्धती.पण ही आमची शिक्षणपद्धती पर्यावरण पूरक नाही.महत्वाची गोष्ट अशी की आमची शिक्षणपद्धती ही पर्यावरण पुरक असो की नसो. पण अभ्यासक्रमातून पर्यावरण वाचवा असा संदेश देता यावा. कागद जर बनवायचा असेल तर वृक्षांची कत्तल होवू नये. कागद हा वाळलेल्या झाडापासून बनविण्यात यावा.

मांस खाणे वा मासे खाणे हे जरी शरीरासाठी आवश्यक असलं तरी मांस खाणं हे वाईटच तसेच पाण्यासाठी साधी विहिर खोदणे ही जरी चांगली गोष्ट असली तरी यामुळं पर्यावरण साखळी बिघडते. असा संदेश पर्यावरण शिक्षणातून देण्यात यावा. तसेच लाकडाच्या चिपाडापासून कागद बनून त्या कागदाचे पाठ्यपुस्तक बनते हेही खरं असलं तरी कागद बनविणे ही गोष्ट वाईटच. ही गोष्ट पर्यावरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने हानीकारक आहे. तेव्हाच आमची शिक्षणपद्धती पर्यावरण पुरक होईल असे म्हणता येईल. हे तेवढंच खरं आहे.

# सत्य मांडण्याचा प्रयत्न अखेर यशस्वी;संघर्षानंतर अखेर 'द महाराष्ट्र फाईल्स' १२ जून रोजी होणार प्रदर्शित




मांडवी/प्रतिनिधी- सामाजिक वास्तवावर भाष्य करणारा आणि समाजातील दुर्बल घटकांच्या न्यायासाठीच्या संघर्षाची कहाणी मांडणारा आगामी मराठी चित्रपट द महाराष्ट्र फाईल्स अखेर १२ जून २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे.शासन दरबारी सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, व्यवस्थेतील अडथळे आणि वंचित समाजाच्या वेदना यांचे प्रभावी चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे.

समाजातील दुर्बल घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा हा चित्रपट केवळ मनोरंजन नसून वास्तवाचा आरसा ठरणार आहे. बंजारा समाजाच्या न्याय, हक्कांसाठी दाखविण्यात येणारी ही भारतातील पहिली फिल्म आहे.मात्र या चित्रपटाचा प्रवास सोपा नव्हता. विविध कारणांमुळे चित्रपटाच्या प्रदर्शनाला विलंब झाला आणि या काळात निर्मात्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सेन्सॉर बोर्डाने केलेल्या विलंबामुळे चित्रपटाचं प्रदर्शन लांबल. एक मराठी निर्माता म्हणून या विलंबाचा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागल्याची भावना निर्मात्यांनी व्यक्त केली आहे. पत्रकार परिषद घेत निर्माते आणि चित्रपटातील कलाकार मंडळींनी या विलंबाबाबत आपली मतं मांडली. यावेळी निर्माते संजीव कुमार राठोड, क्रिएटिव्ह दिग्दर्शक आणि सह निर्माते शालिनी राठोड, अभिनेते मंगेश देसाई यांची उपस्थिती होती.एकूणच या प्रकरणाबाबत बोलताना निर्माते संजीव कुमार राठोड म्हणाले, हा चित्रपट समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांच्या संघर्षावर आधारित आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी आम्हालाही मोठा संघर्ष करावा लागला. अनेक अडथळे आणि सेन्सॉर बोर्डाच्या विलंबाचा सामना करून अखेर हा चित्रपट प्रेक्षकांसमोर आणत आहोत. सत्य मांडण्याचा आमचा प्रयत्न प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा आहे.

या चित्रपटात दिग्गज कलाकार मंडळींची फौज पाहायला मिळणार आहे. अभिनेत्री उषा नाडकर्णी, मंगेश देसाई, वीणा जामकर, सयाजी शिंदे, नागेश भोसले, सुनील गोडसे, सन्नी लिओनी, सपना चौधरी, आर्यन राठोड, गौतमी पाटील, मंगली ही कलाकार मंडळी महत्त्वपूर्ण भूमिकेत आहेत. चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी नितीन सावंत, अजित केतकर आणि सिद्धार्थ कश्यप यांनी सांभाळली आहे. दमदार कथा, प्रभावी अभिनय आणि सामाजिक आशय यामुळे द महाराष्ट्र फाईल्स हा चित्रपट प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारा ठरणार आहे. अनेक अडचणींवर मात करत आता हा चित्रपट १२ जून रोजी राज्यभर प्रदर्शित होत आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# ‘वंचित’च्या दणक्याने फरार झालेला टिप्पर सापडला

## एकनाथ बत्तलवाड यांच्या आमरण उपोषणाच्या इशाऱ्याला यश

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील कुंटूर पोलीस स्टेशनचया हद्दीमध्ये असलेल्या कोलंबी येथील राजेश रामराव दुलेवाड वय १८ या युवकाचा एका विटांच्या टिप्परने शनिवारी ६ तारखेला सोमठाना गावाजवळ भरधाव वेगाने जाऊन उजव्या पायावरून टिप्पर घातल्याने राजेशचा उजवा पाय निकामी झाला. सदरील युवक शासकीय रूग्णालयात उपचार घेत आहे. त्याला उडवलेला टिप्पर चालक टिप्परसह फरार झाला होता.

याबाबतीत वंचित बहुजन आघाडीचे सक्रिय कार्यकर्ते एकनाथ बतलवाड ब्राह्मणवाडेकर यांनी अपघातग्रस्त कुटुंबाची शासकीय रूग्णालयात दोन दिवसापूर्वी भेट घेतली व टिप्पर शोधण्याची मोहीम बत्तलवाड यांनी हाती घेऊन पोलीस अधीक्षकांना २४ तासात टिप्पर न सापडल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिला. याबाबतीत परिवहन खात्याचे सहाय्यक परिवहन अधिकारी यांचीही त्यांनी भेट घेतली व प्रशासन हादरवून टाकले. रात्री उशिरा अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरूव यांनी सदरील गाडी कुंटूर पोलिसांनी जप्त केल्याची माहिती बत्तलवाड यांना दिली. बत्तलवाड यांच्या सतर्कतेमुळे राजेश दुलेवाड या अपघातग्रस्तास न्याय मिळणार आहे.याबाबतीत एकनाथ बतलवाड ब्राह्मणवाडेकर यांनी कहाळा येथे असलेल्या टोल नाक्यावरील सीसीटीव्ही कॅमेर्याबाबत शंका उपस्थित केली आहे. ६ तारखेची घटना सीसीटीव्हीमध्ये कोणत्या कारणाने टिप्परचा नंबर दिसत नाही, हा प्रश्न भेडसावत आहे. पोलीस अधीक्षक या टोलनाक्यावर कार्यवाही करतील का? कारण कुंटूर पोलिसांनी ४ दिवस कार्यवाही का केली नाही? सदरील पोलीस संवेदनशील आहेत का? हाही प्रश्न एकनाथ बतलवाड ब्राह्मणवाडेकर यांनी उपस्थित केला आहे.

# ममता विविधकर यांच्या वारसदारांचा शोध;१५ दिवसांत संपर्क न केल्यास नोकरीचा दावा संपुष्टात

नांदेड/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील मारेगाव खालचे येथील ममता रेखा विविधकर यांच्या खूनप्रकरणी त्यांच्या पात्र वारसदारांना शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत शासकीय अथवा निमशासकीय नोकरी मिळण्याची संधी उपलब्ध असून, संबंधित वारसदारांचा शोध घेण्यासाठी समाज कल्याण विभागाने आवाहन केले आहे.

ममता रेखा विविधकर यांच्या खूनाची नोंद किनवट पोलीस ठाण्यात गु.रं.नं. १३७/२०२४, दि. २८ मे २०२४ रोजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र. २१४, दि. २० नोव्हेंबर २०२५ नुसार अशा प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या कुुंबातील एका पात्र वारसास शासकीय अथवा निमशासकीय नोकरी देण्याची तरतूद आहे.या अनुषंगाने समाज कल्याण विभागाने मयत महिलेच्या वारसदारांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. विभागातील कर्मचाऱ्यांनी मारेगाव खालचे येथे प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली असता, वारसदार राज्याबाहेर वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. मात्र ते नेमके कुठे आणि कोणत्या राज्यात राहतात, याबाबत गावातील सरपंच, पोलीस पाटील व नागरिकांकडे कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती.समाज कल्याण विभागाने मयत महिलेचे वारसदार, रक्ताचे नातेवाईक किंवा त्यांचा संपर्क असलेल्या व्यक्तींनी आवश्यक नातेसंबंधाची कागदपत्रे घेऊन पुढील १५ दिवसांच्या आत संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. निर्धारित मुदतीत संपर्क न झाल्यास शासकीय नोकरीसंदर्भातील दावा संपुष्टात येऊ शकतो, असे समाज कल्याण अधिकारी गजानन नरवाडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.



मालटेकडी येथील किसान फ्रूट मार्केटमध्ये सध्या कच्च्या आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असून बाजारात चांगलीच चहल-पहल पाहायला मिळत आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यांमध्ये अलीकडेच झालेल्या जोरदार वाऱ्यांमुळे तसेच बदलत्या हवामानाच्या परिणामामुळे मोठ्या प्रमाणात आंब्याची फळे झाडांवरून खाली पडली आहेत. त्यामुळे कच्च्या आंब्याचा पुरवठा अचानक वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# माहूर बसस्थानक व्यापारी संकुलाचा प्रस्ताव थंड बस्त्यात

माहूर/प्रतिनिधी-माहूर बसस्थानकाच्या जागेवर बीओटी तत्त्वावर आधुनिक व्यापारी संकुल उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव गेल्या सहा महिन्यांपासून मंत्रालयीन आणि विभागीय कार्यालयांच्या फाईलमध्येच अडकून पडल्याची चर्चा सुरू आहे. धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या माहूरसारख्या ठिकाणी विकासाचा हा मोठा प्रकल्प रखडल्याने सुशिक्षित बेरोजगारांच्या रोजगाराच्या आशांवर पाणी फिरत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

किनवट-माहूरचे आ.भीमराव केराम यांनी १० मार्च २०२५ रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे व्यापारी संकुल उभारणीची मागणी केली होती. त्यानंतर राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभाग नियंत्रकांनी २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सविस्तर प्रस्ताव महाव्यवस्थापक कार्यालयाकडे पाठविला. मात्र त्यानंतर या प्रस्तावाबाबत कोणतीही ठोस हालचाल झालेली दिसून येत नाही. विशेष म्हणजे बसस्थानकासाठी उपलब्ध असलेल्या तब्बल २९ हजार २३४ चौ.मी. जागेवर कोणतेही अतिक्रमण नसल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. महामार्गालगत, मुख्य बाजारपेठेच्या मध्यभागी असलेल्या या जागेवर व्यापारी गाळे, खाद्य विभाग, पार्किंगसह आधुनिक सुविधा विकसित करण्याची मोठी क्षमता असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते. श्रीक्षेत्र माहूर हे राज्यातील प्रमुख शक्तीपीठ आणि पर्यटन केंद्र आहे. वर्षभर हजारो भाविक व पर्यटक येथे येत असतात. अशा परिस्थितीत व्यापारी संकुल उभारल्यास स्थानिक युवकांना व्यवसायासाठी गाळे उपलब्ध होऊन रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळू शकते. मात्र प्रशासनाच्या दिरंगाईमुळे हा प्रकल्प कागदावरच राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव पाठवून सहा महिने उलटले तरी मंजुरी का मिळाली नाही? पर्यटन विकास आणि रोजगार निर्मितीच्या गप्पा मारणारे शासन व प्रशासन आता यावर मौन का बाळगून आहेत? माहूरच्या विकासासाठी महत्त्वाचा ठरणारा हा प्रकल्प नेमका कोणाच्या दुर्लक्षामुळे रखडला आहे? असा सवाल माहूरकर उपस्थित करीत आहे.

# बेकायदेशीर औषध विक्रीवर धडक कारवाईची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील देगलूर शहरासह तालुक्यात हाणेगाव, मरखेल, करडखेड, शहापूर खानापूर, मानूर, माळेगाव, परिसरातील काही मेडिकल दुकानांमधून नियमबाह्य पद्धतीने औषधांचा पुरवठा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून व्यक्त केला जात आहेत. विशेषतः डॉक्टरांच्या वैद्य चिट्ठी शिवाय काही औषधी विकली जात असल्याने सर्वसामान्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून संबंधित मेडिकल दुकाने, घाऊक औषध विक्रेते आणि पुरवठा साखळीची सखोल चौकशी करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. राज्यात विविध विभागांमध्ये कठोर आणि पारदर्शक प्रशासनासाठी ओळखले जाणारे तुकाराम मुंडे सध्या त्यांच्याकडे धडक कारवाईच्या धर्तीवर अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. बेकायदेशीर औषध विक्री कालबाह्य औषधांचा साठा, तसेच नियमाचे उल्लंघन करणाऱ्या मेडिकल चालकावर कठोर कारवाई करण्यात यावी, जोशी आढळणाऱ्याची परवाने निलंबित करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ही पुढे येत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यांशी संबंधित हा गंभीर विषय असल्याने प्रशासनाने नियमित तपासण्या करून औषध विक्री व्यवस्थेत पारदर्शकता आणावी अशी मागणी देगलूर शहर व तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.

# भदंत टेकडी येथील विपश्यना केंद्राचा सुधारीत प्रस्ताव तातडीने सादर करावा-ना.शिरसाट

हदगांव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या भदंत टेकडीवर उभारण्यात येणारे प्रस्तावित विपश्यना केंद्र हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे आध्यात्मिक, पर्यटन आणि अध्ययन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावे. या प्रकल्पातील सर्व तांत्रिक बाबींची कसून तपासणी करून सुधारित प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मुंबईतील बैठकीत दिले.

या बैठकीला आ.बाबुराव कदम कोहळीकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, तसेच नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाचे निवासी उपजिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.राज्यातील एक आदर्श आणि प्रेरणादायी स्थळ बैठकीत बोलताना मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, भदंत टेकडी येथील विपश्यना केंद्राचे बांधकाम अत्यंत भव्य, देखणे आणि आकर्षक असायला हवे. राज्यभरातील नागरिकांना आणि पर्यटकांना या ठिकाणाला आवर्जून भेट द्यावीशी वाटेल, अशा पद्धतीने या संपूर्ण




प्रकल्पाची आखणी करण्यात यावी. हा प्रकल्प केवळ एक इमारत नसून, तो राज्यासाठी आध्यात्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरला पाहिजे. यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करून त्रुटीविरहित सुधारित प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी संबधीत विभागाला आदेशित केले. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विवेक देशमुख हे प्रामुख्याने हजर होते.

# पाच हजाराची दारु जप्त

नांदेड/प्रतिनिधी-सुगाव शिवारात सोमवारी सायंकाळी लिंबगाव पोलीसांनी एका ठिकाणी धाड टाकुन पाच हजार रुपयांची दारु जप्त केली आहे.

सुगाव शिवारातील नाळेश्वर रोडवर दारुची अवैधरित्या विक्री केली जात होती. लिंबगाव पोलीसांच्या एका पथकाने सदरील ठिकाणी धाड टाकुन दारु विक्री करणाऱ्या शैलेंद्र सखाराम मगर यास अटक केली. त्याच्याकडून ५ हजार रुपयांचा दारुचा साठा जप्त केला.

# उमरीत जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-उमरी शहरातील गोरठेकर मंगल कार्यालयाजवळ सुरु असलेल्या जुगार अड्डयावर सोमवारी रात्री पोलीसांनी धाड टाकुन चार जणांना अटक केली. गोरठेकर मंगल कार्यालयाजवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. सोमवारी रात्री १० च्या सुमारास पोलीसाच्या पथकाने सदरील जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून झन्नामन्ना नावाचा जुगार खेळत असतांना कैलास संभाजी पडुळे (वय ३३), रामा चंदु गायकवाड (वय ४२), योगेश सुनील संगेवार (वय ३१), पाशा महेबुब साब (वय ६०) सर्व रा.उमरी यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य पोलीसांनी जप्त केले. या प्रकरणी पोलीस शिपाई आकाश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उमरी पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **SANA TARANNUM SAJID HUSAIN** which now I am, changing as (new name) **SANA TARANNUM MOHD SAJED HUSSAIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SANA TARANNUM MOHD SAJED HUSSAIN**
R/o H.no.242, B.no.11 near Nobel
school Labour colony Nanded-431602
M.No.-9823222134

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.८७०/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.९/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **पांडूरंग पि.दिगंबर कड** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७३/४९ गट क्र.५७३ प्लॉट क्र.४९** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **अनिता भ्र.शंकर सोनाळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ६३२/२०२६ दि.८.४.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील विवेकनगर नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- कॅनालची जागा, पश्चिमेस :- प्लॉट क्र.४८, उत्तरेस :- प्लॉट क्र.४२, दक्षिणेस :- २० फूट रुंद रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.८७०/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.९/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **पांडूरंग पि.दिगंबर कड** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७३/४९ गट क्र.५७३ प्लॉट क्र.४९** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **अनिता भ्र.शंकर सोनाळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ६३२/२०२६ दि.८.४.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील विवेकनगर नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- कॅनालची जागा, पश्चिमेस :- प्लॉट क्र.४८, उत्तरेस :- प्लॉट क्र.४२, दक्षिणेस :- २० फूट रुंद रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.८६८/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.९/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **१) मीरा गोविंद होळकर, २) गोदावरीबाई चंद्रकुमार ढगे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७४/८७ गट क्र.५७४ प्लॉट क्र.८७** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **आशा देवानंद चव्हाण** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २१६/ दि.५.१.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.९४, पश्चिमेस :- २० फूट रुंद रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.८८, दक्षिणेस :- प्लॉट क्र.८६

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.८६९/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.९/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **१) पुंडलिक मारोतराव कानोडे, २) पुरभाजी मारोतराव कानोडे, ३) सोमेश मारोतराव कानोडे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५१५/५-A गट क्र.५१५ प्लॉट क्र.५-A** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **१) चांदोजी रामजी कानोडे, २) होणाजी रामजी कानोडे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- शपथपत्र/सम्मतीपत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ३० फूट रुंद रस्ता, पश्चिमेस :- ३० फूट रस्ता व गट क्र.५१३ मधील जमीन, उत्तरेस :- ३० फूट रुंद रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट क्र.५१३

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# सभापती गजानन मुंडे यांच्या विरुद्ध दाखल केलेल्या अविश्वास ठरावाला उच्च न्यायालयाची स्थगिती

किनवट/प्रतिनिधी-किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास ठरावाच्या प्रक्रियेला मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिलीय. त्यावरून १० जून रोजी बोलावलेली विशेष सभा सध्या स्थगित करण्यात आल्याचे ९ जून रोजीच्या पत्रकात प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकरांनी संचालकांना कळविले आहे.

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १४ संचालकांनी सभापती गजानन मुंडे पाटील यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव दाखल केला होता. या ठरावाच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करत मुंडे पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याचिकेत अविश्वास ठरावाची प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या त्रुटीपूर्ण असल्याचा दावा करण्यात आला होता. त्यावरून न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत दिलासा मिळाला हे विशेष म्हणता येईल. किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चौदा संचालकांना सभापती विश्वासात न घेता कामकाज करतात यासह अन्य मुद्दे घेऊन जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे न्यायाची दाद मागितली. त्यावरून जिल्हाधिकाऱ्यांनी किनवटच्या तहसीलदारांकडे प्रकरण सोपवून अविश्वास प्रस्तावावर संचालकांची विशेष सभा घेण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवली होती. डॉ.चोंडेकरांनी १० जून २०२६ रोजी विशेष सभा बोलावली होती. दरम्यान सभापती मुंडे पाटलांनी न्यायालयात आव्हान दिल्याने तुर्तास तरी आजची विशेष सभा होऊ शकली नाही. त्यामुळे त्या चौदा संचालकांची धावपळ मातीमोल ठरल्याच्या चर्चेला रान मोकळे झाल्याचे ऐकायला मिळते.

सभापती मुंडे पाटलांनी अविश्वास ठरावाला आव्हान देत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. सदरहू याचिकेवरील प्राथमिक सुनावणी दरम्यान न्यायालयाने संबंधित बाबींचा विचार करून सभेला स्थगिती दिली. परिणामी, अविश्वास ठरावावर निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला पुढील आदेशापर्यंत अंतरिम स्थगिती दिली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ एस.एस.टोपे यांनी न्यायालयात बाजू मांडली, तर ॲड.केशव रामराव घुले यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे किनवट तालुक्यातील राजकीय घडामोडींना नवे वळण मिळाले असून, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सहलीवर गेलेल्या संचालकांचा हिरमोड?

सभापती गजानन मुंडे पाटील यांच्या विरुद्ध अविश्वास प्रस्तावाचे शुक्लकाष्ठ लाऊन संचालकांची टीम सहलीवर निघून गेले. १० जून रोजी अविश्वास प्रस्तावावर संचालकांच्या चर्चेसाठी आणि निर्णायक भूमिकेसाठी जिल्ह्याधिकाऱ्यांनी किनवटच्या तहसीलदारांमार्फत विशेष सभा बोलावली होती. संचालकांच्या वज्रमूठीची पक्कड ढिली होऊन संख्या गळती टाळण्यासाठी चौदा संचालकांचे मंडळ सहलीवर गेले होते. दरम्यान सभापती मुंडे पाटलांनी न्यायालयात धाव घेऊन अविश्वासाचा किमान १० जून रोजीच्या विशेष सभेचा बार फुसका केलाय.

# राज्यातील बहुतांश शाळा १५ जूनपासून सुरु होणार

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील पुणे, मुंबई, नाशिक, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आदी भागांतील शाळा १५ जूनपासून सुरू होणार आहेत. मात्र, विदर्भातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा नागपूर खंडपीठाच्या निर्णयानुसार ३० जूनपासून सुरू होतील. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी स्थानिक प्रशासन व शिक्षण विभागाकडून जारी होणाऱ्या अधिकृत सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जून महिना आला की शाळा सुरु कधी होणार? याकडे विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष लागलेले असते. राज्यातील शाळा सुरू होण्याबाबत महत्त्वाचा बदल जाहीर करण्यात आलाय. उन्हाळी सुट्टीनंतर राज्यातील शाळा सुरू होण्याची तयारी सुरू असतानाच शिक्षण विभागाने शाळांच्या वेळापत्रकाबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील बहुतांश भागातील शाळा १५ जूनपासून नियमितपणे सुरू होणार आहेत. मात्र, विदर्भातील तीव्र उष्णतेची परिस्थिती लक्षात घेऊन तेथील शाळांच्या प्रारंभाबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती.गेल्या काही आठवड्यांपासून विदर्भात विक्रमी तापमानाची नोंद होत आहे.

# ग्रामीण शिक्षण व समाजसेवेची दखल; डॉ.विक्रम देशमुख यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

उमरी/प्रतिनिधी-एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने जागतिक दृष्टिदान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकता रत्न पुरस्कार अंतर्गत शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर यांना शिक्षण व सामाजिक कार्य जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



या पुरस्काराचे वितरण गुरुवार, दि. ११ जून रोजी दुपारी २ वाजता मुंबई येथील आझाद मैदानातील पत्रकार भवन येथे आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा विभाग शिक्षक मतदारसंघाचे आ.विक्रमराव काळे हे राहणार आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमात एकता सेवाभावी संस्थेचे प्रांत संघटक तथा नवनिर्वाचित खासदार रामरावजी वडकुते यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे. डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर हे गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

# वाई बाजार, सारखणी गुटख्याच्या विळख्यात; प्रशासन झोपेत?

माहूर/प्रतिनिधी-राज्यात गुटखा मुक्त महाराष्ट्र, निरोगी महाराष्ट्र ही मोहीम राबवून अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विक्रेते व भेसळखोरांविरोधात धडक कारवाईचे आदेश दिले असले, तरी माहूर तालुक्यातील वाई बाजार व सारखनी परिसरात गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे राज्यातील गुटखा बंदीची अंमलबजावणी केवळ कागदावरच राहिली आहे का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

राज्य शासनाने २०१२ मध्ये गुटखा, पानमसाला व तंबाखू मिश्रित पदार्थांच्या विक्री, साठवणूक आणि वितरणावर बंदी घातली. मात्र तब्बल १४ वर्षांनंतरही गावागावातील पानटपऱ्यांवर गुटख्याची पाकिटे सहज उपलब्ध आहेत. बंदी असतानाही विक्रेते निर्धास्तपणे व्यवसाय करत असल्याने संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.वाई बाजार आणि सारखनी परिसरात गुटख्याचा व्यापार इतका बिनधास्त सुरू आहे की, विक्रेत्यांना कोणत्याही कारवाईची भीती उरलेली नाही. त्यामुळे गुटखा विक्रीला कोणाचे संरक्षण आहे, हा प्रश्न अधिकच गडद होत आहे. संबंधित विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी यांची निष्क्रियता तस्करांसाठी पोषक वातावरण निर्माण करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. माहूर तालुका हा तेलंगणा राज्याच्या सीमेलगत असल्याने आदिलाबाद येथून मांडवी मार्गे मोठ्या प्रमाणात गुटखा आणला जात असल्याचा आरोप होत आहे. राज्यात बंदी असताना सीमावर्ती भागातून होणारी ही तस्करी रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. पुणे जिल्ह्यातील विषारी दारू प्रकरणात २० जणांचा मृत्यू झाल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून राज्यभर अवैध दारूविरोधात धाडसत्र सुरू करण्यात आले आहे. मात्र माहूर तालुक्यात अपवादात्मक काही पोलीस कारवाया वगळता ना अन्न व औषध प्रशासन सक्रिय दिसते, ना उत्पादन शुल्क विभाग. त्यामुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे मनोबल वाढल्याची भावना व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे, राज्यभर तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार गुटखा माफियांविरोधात मोहीम सुरू असताना माहूर तालुक्यात या संदर्भात ठोस कारवाई झाल्याचे चित्र दिसत नाही. परिणामी, एकटे तुकाराम मुंढे किती ठिकाणी लक्ष देणार? स्थानिक यंत्रणा नेमकी काय करत आहे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. गुटखा, अवैध तंबाखूजन्य पदार्थ आणि सीमावर्ती भागातून होणारी तस्करी रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन, उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम हाती घेऊन कठोर कारवाई करावी, अन्यथा गुटखा मुक्त महाराष्ट्र ही घोषणा केवळ घोषणाच राहील, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# वादळी वारा, पावसामुळे जनता इंडस्ट्रीजचे कोट्यावधींचे नुकसान

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद येथील बाळापूर रोडवरील जनता इंडस्ट्रीजला दि.६ रोजी सायंकाळी पाऊस व जोरदार वादळामुळे गोदामावरील टिनशेड उडून गेल्याने गोदामात साठवून ठेवलेला तयार व कच्चा माल पावसाच्या पाण्यात भिजून एक कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

धर्माबादचे लाल तिकटला देश-परदेशासह आपल्या पुर्ण राज्यात खुप मागणी आहे. वादळी वाऱ्यानंतर झालेल्या पावसामुळे गोदामामध्ये साठवलेले मिरची पावडर, हळद पावडर व विविध प्रकारचे मसाले पावडर सर्व मिळून अंदाजे एक कोटी रुपये किमतीचे माल पावसामुळे खराब झाला आहे. तसेच टीम शेडचे जवळपास ५० लाख रुपयाचे नुकसान झाले अशी माहिती डीएमएच कंपनीचे मालक शेख अमिरोद्दीन यांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच नायब तहसीलदार परमानंद गावंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पंचनाम्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सुचना दिल्याचे समजते. जनता इंडस्ट्रीजचे मालक अमिरोद्दीन शेठ यांनी सांगितले ही एक पूर्णपणे नैसर्गिक आपत्ती असून वादळी वाऱ्यामुळे आपल्या उद्योगाचे मोठे नुकसान झाले आहे. तयार माल, कच्चामाल आणि गोदामाचे संरचनेचे मिळून जवळपास एक कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. शासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत जाहीर करावी या घटनेमुळे परिसरातील उद्योजकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून नैसर्गिक आपत्तीत नुकसानग्रस्त उद्योगांना शासनाने विशेष मदत देण्याची मागणी होत आहे. दरम्यान प्रशासनाकडून नुकसानीचा सविस्तर अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



नांदेड येथील उत्पादन क्षुल्क विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गावठी दारु विक्री विरोधात मोहीम सुरु केली असून आतापर्यंत ३६ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांच्याकडून दहा लाख ७२ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

# श्यामसुंदर गायकवाड यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड

नायगाव/प्रतिनिधी-सामाजिक, सांस्कृतिक आणि पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असलेले नरसी येथील युवा गायक तथा पत्रकार श्यामसुंदर गायकवाड यांची भीमआर्मी ब्ल्यू पँथर या सामाजिक संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भीमआर्मी ब्ल्यू पँथर संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष डॉ. हेमंतकुमार हिरोळे यांनी श्यामसुंदर गायकवाड यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होत विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या निवडीबद्दल अनेकांनी अभिनंदन केले आहे.



# माहूर तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षणाची १२ जूनला सोडत

माहूर/प्रतिनिधी-फेब्रुवारी २०२६ मध्ये मुदत संपलेल्या माहूर तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत १२ जून रोजी काढण्यात येणार आहे. याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आरक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून संबंधित प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

माहूर तालुक्यातील हडसणी, अनमाळ, लिंबायत, पापलवाडी, आसोली व मेट या ग्रामपंचायतींमध्ये सदस्य पदांसाठी आरक्षण प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२६ मध्ये संपल्यानंतर तेथे प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती. गेल्या चार महिन्यांपासून प्रशासकीय कारभार सुरू असल्याने विकासकामांवर परिणाम होत असल्याची भावना स्थानिक स्तरावर व्यक्त केली जात होती.कार्यक्रमानुसार ८ जून रोजी विशेष ग्रामसभेची नोटीस प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर १२ जून रोजी सकाळी ११ वाजता तहसीलदार अथवा प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विशेष ग्रामसभा घेऊन सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढण्यात येईल. सोडतीनंतरची कार्यवाही पूर्ण करून संबंधित परिशिष्टे त्याच दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत तहसील कार्यालयात सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. १९ जून रोजी प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यावर नागरिकांना हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. प्राप्त हरकतींवर ३ जुलै रोजी उपविभागीय अधिकारी स्तरावर सुनावणी होईल. त्यानंतर ८ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडून अंतिम अधिसूचनेस मंजुरी देण्यात येणार असून १० जुलै रोजी अंतिम प्रभाग रचना व आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे.आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर झाल्याने संबंधित ग्रामपंचायतींमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून संभाव्य इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. निवडणूक प्रक्रियेला गती मिळाल्याने ग्रामपंचायतींमधील राजकीय वातावरणही तापू लागले आहे.

पान १ वरुन

### मुख्यमंत्री कार्यालय, विधान भवनासह...

घेण्याची भाषा वापरण्यात आली असून, काही राजकीय आणि धार्मिक स्वरूपाचे दावे करण्यात आले आहेत. ई-मेलच्या शेवटी चार व्यक्तींच्या नावांचाही उल्लेख करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.धमकीचा ई-मेल मिळताच पुणे पोलीस, बॉम्ब शोधक व नाशक पथक आणि सायबर विभागाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. हा ई-मेल कोणत्या आयपी ड्रेसवरून पाठवण्यात आला, तो खरा आहे की केवळ भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

### काँग्रेसमध्ये तृणमूल विलीन करण्याचा...

लोकसभेतील टीएमसीच्या २८ खासदारांपैकी २० खासदारांनी स्वतंत्र भूमिका घेत एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या घडामोडींमुळे ममता बॅनर्जी यांच्याकडे लोकसभेत केवळ ८ खासदार, राज्यसभेत ११ सदस्य आणि पश्चिम बंगाल विधानसभेत २२ आमदार उरल्याचे चित्र आहे. त्यामुळे २८ वर्षे जुन्या तृणमूल काँग्रेसपुढे अस्तित्वाचे संकट निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.पक्षातील वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर टीएमसीचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी बुधवारी दिल्लीत राहुल गांधी यांची भेट घेतली. दोन्ही पक्षांच्या राजकीय ताकदीचे गणित आणि आगामी रणनीती यावर या बैठकीत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

### शिष्यवृत्ती अभावी टी.सी.रोखणाऱ्या...

समाज कल्याण कार्यालयातून तात्काळ कडक परिपत्रक जारी करण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली. या गंभीर विषयावर प्रशासनाने त्वरित दखल घेऊन परिपत्रक न काढल्यास, एसएफआय नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, नांदेड समोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी एसएफआयचे जिल्हा सहसचिव कॉ. पवन जगडमवार, मनिषा थोरात, सूरज जीमेकर, सूरज कांबळे, शितल आंबेकर, दिव्या भिसे यांच्यासह अनेक उपस्थित होते.

# गणाचार्य मठ संस्थान, मुखेड येथे इष्टलिंग महापूजा

मुखेड/प्रतिनिधी-ज्येष्ठ अधिकमासाच्या निमित्ताने गणाचार्य मठ संस्थान, मुखेड येथे श्रीमद उज्जैनी सधर्म सिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ जगद्गुरू सिद्धलिंगराज देशी केंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पावन सान्निध्यात भव्य इष्टलिंग महापूजा, धर्मसभा व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम शनिवार, दि.१३ जून २०२६ रोजी गणाचार्य मठ संस्थान, मुखेड येथे संपन्न होणार असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता इष्टलिंग महापूजेने होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता धर्मसभेचे आयोजन करण्यात आले असून, जगद्गुरू सिद्धलिंगराज देशी केंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली धर्म, संस्कृती आणि अध्यात्म विषयांवर विचारमंथन होणार आहे. या धर्मसभेमध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतून येणाऱ्या पौरोहित्य, कीर्तनकार, गायक, वादक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच उपस्थित भाविकांना जगद्गुरू महास्वामीजींचे आशीर्वचन लाभणार असून त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे. यानंतर दुपारी २ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून धार्मिक परंपरा, आध्यात्मिक मूल्ये आणि समाजातील एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# लोहा बसस्थानकातून महिलेचे गंठन लंपास

नांदेड/प्रतिनिधी-लोहा बसस्थानकातून एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन चोरट्यांनी लंपास केल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली आहे.

हेमंत दिलीपराव रुद्रवार (वय ४४) रा.धारुर जि.बीड हे पत्नी समवेत लोहा येथील मुख्य बसस्थानकात मंगळवारी दुपारी एसटीची वाट बघत थांबले होते. अज्ञात चोरट्यांनी रुद्रवार यांच्या पत्नीच्या गळ्यातील ७५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठन गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले आहे. हेमंत रुद्रवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लोहा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक श्री.भोसले हे करीत आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४